दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

• वर्ष १६ वे • अंक १९२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.७ ऑक्टोबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## लखीमपूर घटनेवर महाविकास आघाडी आक्रमक

# ११ ऑक्टोबरला महाराष्ट्र बंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथील घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्रातील सत्ताधारी महाविकास आघाडीने ' महाराष्ट्र बंद 'ची हाक दिली आहे. ११ ऑक्टोबर रोजी या घटनेचा निषेध करण्यासाठी राज्यव्यापी बंद पाळावा, असे आवाहन शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केले. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतही लखीमपूर खेरी घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली.**



राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे, काँग्रेसचे मंत्री बाळासाहेब थोरात यांची पत्रकार परिषद झाली. यावेळी पाटील यांनी लखीमपूर घटनेचा निषेध करत महाराष्ट्र बंदची घोषणा केली.

भाजपचं सरकार शेतकऱ्यांशी क्रूरपणे वागत आहे. त्यांचे आंदोलन चिरडत आहे. लखीमपूर घटनेतील आरोपींना अटकही करण्यात आली नाही. याचा आज मंत्रिमंडळात निषेध करण्यात आला व जे हुतात्मा झाले आहेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली, असे पाटील यांनी सांगितले.

शिवसेनेची भूमिका एकनाथ शिंदे यांनी मांडली. शिवसेना नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठिशी राहिलेली आहे. लखीमपूरची घटना निषेधार्ह असून त्याविरोधात पाळण्यात येत असलेल्या बंदमध्ये शिवसेना सहभागी होत आहे, असे शिंदे यांनी सांगितले. भाजपचं सरकार जनरल डायरप्रमाणे वागत आहे. शेतकऱ्यांचं आंदोलन चिरडणाऱ्या भाजपचा खरा चेहरा दिसला आहे, अशी तोफ डागत बाळासाहेब थोरात यांनीही काँग्रेस बंदमध्ये उतरणार असल्याचे सांगितले.

**उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथील घटनेत शेतकऱ्यांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूसंदर्भात आज राज्य मंत्रिमंडळाने खेद व्यक्त करण्याचा ठराव केला. यावेळी मंत्रिमंडळाने दोन मिनिटे उभे राहून मरण पावलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली देखील वाहिली. यासंदर्भात जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी प्रारंभी निवेदन केले आणि महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी अनुमोदन दिले.**

# बनावट सोन्याचे दागिने खारघर पोलिसाने केले हस्तगत

## खारघर पोलिसांची कारवाई ; चार आरोपींना केली अटक

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल : बनावट सोन्याचे दागिने बँकेत गहाण ठेवून, त्या सोन्यावर लाखो रुपयांचे कर्ज उकळणाऱ्या टोळी कडून खारघर पोलिसांनी २११.२ तोळे बनावट सोने जप्त केले आहे. खोट्या सोन्याला सोन्याच्या पाण्याची झळाळी देऊन ते सोने खरे असल्याचे भासवून त्यावर ही टोळी हे सोने बँकेत ठेवून कर्ज काढायची त्या पैश्यावर अय्याशी करायची या प्रकरणी खारघर पोलिसांनी या ८ जणांच्या टोळी पैकी ४ आरोपीने अटक केली आहे.**

सवोवी वेन्सन मार्टिन वय ४५ राहणारा नेरुळ , परशुराम सखाराम देवरूखकर वय ४५ राहणार खारघर, भरत शुभसिंग राजावत वय ३० राहणार नेरुळ, सुनील फराटे वय ४७ राहणार खारघर असे पकडलेल्या चार आर-ोपीचे नावे आहे. हे चार आरोपी अन्य फरार असलेल्या चार आरोपीच्या मदतीने, बनावट सोने खरे भासवून, बँकेत ठेवायचे आणि त्याच्यावर कर्जाच्या स्वरूपात पैसे उकळत होते. मात्र कामोठे येथील तक्रारदार प्रमोद गर्ग यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्या नंतर हा सर्व प्रकार समोर आला आहे. आरोपी पैकी सवोवी मार्टिन हा तक्रारदार गर्ग याचा मित्र होता. मार्टिन याने खारघर येथील ग्रेट बॉम्बे बँक शाखा खारघर येथे तारण म्हणून ठेवलेले सोन्याचे दागिने सोडवून आणल्या नंतर त्या सोन्याची चैकशी केली असता हे सोने बनावट सल्याचे गर्ग यांच्या लक्षात आले. त्या नुसार गर्ग यांनी या घटनेची महिती पोलीसांना दिली आणि पोलिसांनी या बाबत गुन्हा नोंदऊन याची तपासणी करण्यास सुरुवात केली. नेरुळ आणि कोपरखैरणे येथील सोन्याचे व्हॅल्यूएशन करुन देयची आणि त्यांच्यातील काही फरार आरोपी मधील आरोपी हा बनावट दागिने बनवून देयचा आणि याच टोळीतील एक मित्र त्याच्या मित्राच्या नावावे बँकेत सोने ठेवून त्यावर कर्ज देखील घेयचा या गुन्ह्यांची उकल झाल्या नंतर खारघर पोलिसांनी या टोळीतील जवलर्स व्यापारी याना देखील अटक करून त्याच्या कडून २११.२ तोळे सोने आरोपी कडून जप्त केले आहे.

# उरणमध्ये जलवाहिनी वारंवार फुटतेय कशी?

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण परिसराला पाणी पुरवठा करणारी एमआयडीसीची तीन फूट व्यासाची जलवाहिनी काल सकाळी पुन्हा एकदा अच-ानक फुटण्याची घटना घडली आहे.जेएनपीटी टाऊनशिप - नवघर दरम्यान फुटलेल्या उच्च दाबाच्या जलवाहिनीमुळे सुमारे २५ फुट उंचीपर्यंत पाण्याचे कारंजे उडून लाखो लिटर्स पाणी वाया गेले. परंतु नवघर ते बोकडविरा



या एक कि.मी अंतरावर एम.आय. डी.सी.ची जलवाहिनी वारंवार फुटतय .../२

## संक्षिप्त...

### भाजपला धक्क्यावर धक्के ; एक बडा नेता पक्ष सोडणार

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षाला धक्क्यांवर धक्के बसू ला-गले आहेत. निवडणुकीआधी तृणमूल काँग्रेसला गळती लागली होती. तृणमूलमधील अनेक मोठे नेते भाजपमध्ये गेले. मात्र आता यातील अनेक नेत्यांनी पुन्हा तृणमूलची वाट धरली आहे. राज्यातील तृणमूलचं सरकार कायम राहिल्यानं अनेक नेत्यांनी घरवापसी केली आहे. भाजपचे राज्य सचिव सब्यसाची दत्ता लवकरच तृणमूलमध्ये प्रवेश करणार आहेत.

विधाननगरचे माजी महापौर दत्ता गेल्या काही दिवसांपासून तृणमूलच्या नेतृत्त्वाच्या संपर्कात आहेत. २०१९ मध्ये दुर्गापूजेच्या आधी दत्ता यांनी टीएमसीची साथ सोडत कमळ हाती घेतलं. आता दोन वर्षांनंतर दत्ता स्वगृही परतणार आहेत. दसऱ्याच्या आसपास त्यांचा पक्षप्रवेश होईल. काही दिवसांपूर्वीच भाजप खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री बाबुल सुप्रियोंनी भाजपला रामराम करत तृणमूलची वाट धरली. सुप्रियो यांच्याकडे असलेलं मंत्रिपद काढून घेण्यात आल्यानं ते नाराज होते. विधानसभा निवडणुकीत भाजपनं चांगलं यश मिळवलं. मात्र त्यांना सत्ता मिळवता आली नाही. विधानसभा निवडणूक निकालानंतर अनेक नेत्यांनी घरवापसी केली. यामध्ये मुकूल रॉय, विष्णूपूरचे आमदार तन्मय घोष, कालियागंजचे आमदार सौमेन रॉय, बागडाचे आमदार विश्वजीत दास यांचा समावेश आहे.

# कर्जत तालुक्यातील सावेळे येथे वयोवृद्धाचा खून

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील सावेळे ग्रामपंचायत हद्दीतील सावेळे गावात असलेल्या म्हशींच्या तबेल्यावर काम करणाऱ्या वयोवृद्ध कामगाराचा खून झाला आहे. या घटनेत आणखी एका व्यक्तीला मारण्याचा प्रयत्न मध्यरात्री नंतर आलेल्या चार अज्ञात मारेकऱ्यांनी केला आहे.दरम्यान, या खुनाच्या प्रकरणात कर्जत पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून दोन संशयित यांच्यावर पोलिसांनी संशय व्यक्त केला आहे.




कर्जत तालुक्यातील सावेळे गावातील आरिफ हाजीमिया मुल्ला यांचा म्हशीचा तबेला आहे. त्यांच्याकडे गणपत रावजी जाधव हे अनेक वर्षांपासून कामगार म्हणून काम करीत होते. मंगळवार रात्री दीड ते दोन च्या सुमारास त्या तबेल्यावर चार अज्ञात इसम आले आणि त्यांनी तेथे असलेल्या कॉटवर झोपलेल्या व्यक्तीच्या अंगावर चादरीने तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. डासांचा त्रास होऊ नये म्हणून अंगावर चादर घेऊन झोपलेले आरिफ मुल्ला यांची देहयष्टी मजबूत असल्याने त्यांनी तोंड दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या अज्ञात व्यक्तींना आपल्या ताकदीने फेकून दिले. मात्र त्यावेळी आरडाओरडा करीत असलेले ७५ वर्षीय कामगार गणपत रामजी जाधव यांच्या डोक्यात धारदार शस्त्रांनी मारहाण केली. तर अज्ञात इसमांच्या तावडीतून सुटल्यानंतर त्यांच्या डोक्यात त्या अज्ञात इसमांनी लोखंडी हत्यारांनी वार केल्याने आरिफ मुल्ला आणि गणपत जाधव हे रक्ताच्या थारोळ्यात पडून राहिले. त्या तबेल्यावर पहाटे साधारण अडीच वाजता आरिफ मुल्ला यांचा मुलगा दूध काढण्यासाठी दररोज येत असतो. सादिक आरिफ मुल्ला हा तबेल्यावर पोहचला असता त्याला त्याचे वडील आरिफ .../२

# पनवेल विद्युत वितरण कंपनीच्या गलथान कारभार विरोधात पनवेल तालुका पत्रकार महासंघ आंदोलनाच्या पावित्र्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल विद्युत वितरण कंपनीचा गेले तीन महिन्यापासून गलथान कारभार सुरू आहे. नागरिकांनी वीजेची बिले भरली नाहीत तर त्यांच्यावर उचित कारवाई केली जाते आणि त्यांचा विद्युत प्रवाह बंद केला जातो व तो पुन्हा सुरू करण्यासाठी नाहक ग्राहकांना भुर्दंड दिला जात आहे. परंतु पनवेल विद्युत वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान होत असताना त्याकडे डोळेझाक केली जात आहे. पनवेल विद्युत वितरण कंपनीच्या कारभाराविरोधात पनवेल तालुका पत्रकार महासंघ आंदोलनाच्या पावित्र्यात उतरणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.



पनवेल शहरात गेले तीन महिन्यापासून विद्युत वितरण कंपनीच्या बेबंदशाही, गलथान आणि गलिच्छ कारभारामुळे दिवसातून किमान २५ वेळा विद्युत प्रवाह खंडीत होत असतो. त्यामुळे दुधाचे व्यापारी, आईस्क्रिमचे व्यापारी, किराणा मालाचे व्यापारी, अन्य व्यापाऱ्यांसह नागरिकांना मोठा फटका बसत आहे. त्याकडे विद्युत वितरण कंपनीचे पनवेल विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता डोळेझाक करीत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. या विरोधात पनवेल तालुका पत्रकार महासंघ तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडणार असल्याची माहिती महासंघाचे ज्येष्ठ सल्लागार सुनील पोतदार यांनी दै.रायगड नगरी जवळ बोलताना दिली. याबाबत दोन दिवसात विद्युत वितरण कंपनीच्या अतिरिक्त कार्यकारी अभियंत्यांनी पनवेल तालुका पत्रकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी योग्य मार्ग निघण्यासाठी चर्चा केली नाही तर आंदोलन हे होणार असून या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी विद्युत वितरण कंपनीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांची राहणार आहे.

# नवी मुंबईकरांसाठी बेलापूर ते भाऊचा धक्का प्रवासी बोट सुरू होणार

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नवी मुंबईकरांना लाभलेला खाडी किनारा लक्षात घेता जलवाहतूक मार्गासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे खासदार राजन विचारे यांनी बेलापूर येथे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत तसेच नेरुळ येथे सिडको मार्फत असलेली जेट्टीची कामे लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करीत होते. त्यांच्या पाठपुराव्याने ही सर्व कामे पूर्णत्वास येत आहेत. खासदार राजन विचारे यांनी अंतिम टप्प्यातील कामे कितपत पूर्ण झाली आहेत. याचा आढावा घेण्यासाठी बेलापूर व नेरूळ येथील जेट्टीची पाहणी केली. त्यामध्ये सिडको मार्फत ११० कोटी खर्च करून नेरूळ येथे उभारण्यात आलेल्या जेट्टीचे काम पूर्ण झाले. सदर कामात महत्त्वपूर्ण असलेली प्रवाशांसाठी चढण्या व उतरण्यासाठी फेंडर व स्टेअरकेस यांची कामे शिल्लक असून येत्या काही दिवसात पूर्ण होणार आहेत.



तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत बेलापूर येथे पर्यटकांकरिता जेट्टी बनविण्याच्या कामास सन २०१८ मध्ये केंद्र शासनाच्या सागर माला योजने अंतर्गत मंजुरी मिळाली असून यामध्ये केंद्रशासन ५० टक्के व राज्य शासनाचे ५० टक्के असे एकूण ८.३० कोटी अनुदानास मंजुरी मिळवली होती. सदर कामास जानेवारी २०१९ ला कार्यादेश मिळाल्यानंतर ऑगस्ट २०१९ ला पर्यावरण खात्याकडून सी आर झेड ची मान्यता मिळाल्यानंतर जेट्टीचे काम सुरू झाले.

सदर जेट्टी ही एल टाईप मध्ये आहे त्याची लांबी ७१×१० उतरणारी जेट्टी ५५×१० अशी असणार आहे. सद्यस्थितीत जेट्टीचे काम ९५% पूर्ण झालेले आहे. उर्वरित ५ टक्के जेट्टीवर येणाऱ्या रस्त्याचे काम बाकी आहे. येत्या १५ दिवसात हे काम पूर्ण होणार आहे.

खासदार राजन विचारे यांनी काल माननीय महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेऊन नेरूळ तसेच बेलापूर येथील जेट्टीची कामे लवकर मार्गी लावून याचा लोकार्पण सोहळा करण्यात यावा असे प्रशासनाला आदेश देण्याची विनंती केल्यानंतर मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित सैनी यांची भेट घेऊन कामाची स्थिती जाणून घेतली. त्यामध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने पर्यटकांसाठी पॅसेंजर बोट व वॉटर टॅक्सी (स्पीड बोट) देण्याचे ठरविले आहे.

पॅसेंजर बोट मध्ये ५० व्यक्ती बसण्याची क्षमता असणार आहे. सदर बोटीतून बेलापुर ते भाऊचा धक्का येथे जाण्यासाठी ३०० रुपये मोजावे लागणार आहेत या बोटीतून प्रवासासाठी ४५ ते ५५ मिनिट लागणार आहेत. तसेच वॉटर टॅक्सी (स्पीड बोट) यामध्ये १० व्यक्ती बसण्याची क्षमता असणार आहे.

बोटीतून बेलापुर ते भाऊचा धक्का पर्यंत ९०० रुपये मोजावे लागणार आहेत. या .../२

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धुपप्रतिबंधक बंधाऱ्याची दुर्दशा ; जनतेच्या पैश्याची उधळण

## गाळ्यांमधील लाईट व पंखे चोरीला ; प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : श्रीवर्धनच्या सुशोभीकरणात खा. सुनील तटकरे यांचं अत्यंत महत्वाच काम कोणतं असेल तर समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यात आलेला १४ कोटींचा धुपप्रतिबंधक बंधारा. मात्र या बंधाऱ्यांची अत्यंत दुर्दशा झालेली असून नगरपालिका प्रशासनाने अद्याप कोणतेही डागडुजीचे काम सुरू केल्याचं दिसत नाही.

समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यावर पाणी जाण्यासाठी ठीक ठिकाणी मोऱ्या बांधण्यात आल्या आहेत. त्या ठिकाणी असलेल्या पादचारी पुला-वरील फळ्या पूर्णतः जीर्ण झालेल्या असून अपघात होण्याची शक्यता आहे. लाकडी फळ्या आणि कोकणातील पाऊस त्यात खार हवामान त्यामुळे फळ्या कुसलेल्या आहेत. तर काही फळ्यांना वाळू ला-गलेली दिसत आहे. सकाळी मॉर्निंग वॉक पासून रात्री जेवणानंतर शतपावली करण्यासाठी देखील स्थानिक नागरिक हा बंधाऱ्यावरून फिरत असतात. त्यात लॉक डाउनच्या शिथिलतेमुळे सध्या थोडं थोडक्या पर्यटकांची पावलं देखील पुन्हा श्रीवर्धनकडे वळत आहेत. अश्यावेळी जीर्ण झालेल्या लाकडी फळ्यांमध्ये जर एखाद्या अबाल वृद्धाचा पाय अडकून अपघात झाला तर जबाबदार कोण? स्वच्छतेच्या .../२

> नगराध्यक्ष व पालिका प्रशास-नाची झोप दुपारी एक वाजता उडते त्यामुळे आश्या गोष्टींकडे लक्ष देण्यासाठी पाहणी करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही. हा जनतेच्या पैश्यांचा अपव्यय आहे
>
> **-संतोष वेश्विकर, माजी शहरप्रमुख शिवसेना श्रीवर्धन**


# केमिकल मिश्रीत पाण्याने कुंडलिका प्रदुषित

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा धाटाव औद्योगिक क्षेत्रात अनेक केमिकल्स युक्त कारखाने मात्र त्यातील काही कारखादारांचा केमिकल मिश्रीत सांडपाणी थेट कुंडलिका नदी पात्रात आल्याने धाटाव पासून रोहा कडे वाहणारी कुंडलिका नदी पूर्णतः प्रदूषित झाल्याने तसेच दूषित पाणी नदीप-ात्रात गेल्याने मोठी दुर्गंधी पसरल्याने परिसरातील नागरिकांचा एकच संताप व्यक्त केला जात आहे.

सदरचे कारखानदार यांच्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळांनी अनेकदा धाडी टाकल्या पाहणी देखील केली परंतु याबाबत कोणतीच ठोस भूमिका अथवा त्यावर उपायुक्त अशी उपाययोजना केली जात नाही याला जबाबदार कोण असा सवाल व्यक्त केला जात आहे. केमिकल मिश्रीत पाण्याचा त्रास नाहक नदीकाठी वसलेल्या ग्रामस्थ नागरिकांना होत आहे त्यातच बारमाही वाहणारी ही कुंडलिका नदी तसेच भरती ओठीत असल्याने यात असे पाणी प्रदूषित होत असल्याने या पाण्यामुळे मासे मृत्युमुखी पडत आहेत. अशा या प्रकाराबाबत पुन्हा एकदा प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

कारखाने चालले पाहिजे रोजनदारी ठिकली पाहिजे असे वाटते परंतु या प्रकारावर अधिक काही उपाय योजना सदरील औद्योगिक क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी वर्गाने तसेच प्रदूषण मंडळाने करणे गरजेचे आहे. तसेच आशा या सांडपाण्यावर वेळेवर नियोजन करून याची खबरदारी घेत नाहीत यांच्यावर काटेकोरपणे कारवाही केली पाहिजे असे सर्वत्र बोलले जात आहे.



# साखर-सुतारवाडी आणि केवनाळे दरडग्रस्त भागाची पाहणी; पुढे काय?

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील साखर सुतारवाडी आणि देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे या दोन दरडग्रस्त गावांची पाहणी करण्यासाठीचा केंद्रीय समितीचा दौरा संपल्यानंतर नागोठणे येथील रिलायन्स कंपनीच्या बैठक सभागृहात याबाबत चर्चा झाली असली तरी दरडग्रस्त गावांबाबतची जी वस्तुस्थिती स्थानिक बाधितांना माहिती आहे, त्याबाबत मुंबईस्थित स्थानिकांना काय सांगितले गेले आहे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे हेतू काय, याबाबत पुढे काय होणार असा प्रश्नचिन्ह दरडग्रस्त गावांमध्ये निर्माण झाला आहे.

महाड तालुक्यातील तळीये आणि पोलादपूर तालुक्यातील साखर ग्रामपंचायत हद्दीतील सुतारवाडी आणि देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे गावांमध्ये केंद्रीय समितीसोबत पाहणी दौरा सोमवार व मंगळवारी करण्यात आला. यावेळी नागोठणे रिलायन्सच्या बैठक सभागृहामध्ये जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथकातील केंद्रीय वित्तमंत्रालयाचे संचालक अभेयकुमार, केंद्रीय कृषी,सहकार आणि शेतकरी कल्याण विभागाचे संचालक डॉ.सुभाष चंद्रा, केंद्रीय ग्रामीण विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त आयुष पूनिया या सदस्यांसमोर महाड येथील पूरपरिस्थिती तसेच तळीये व साखर सुतारवाडी, केवनाळे येथील झालेले भू:स्खलन, दरड कोसळून झालेली दुर्घटना, या दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने केलेली कार्यवाही तसेच दुर्घटनाग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन याबाबतची संगणकीय सादरीकरणद्वारे सविस्तर माहिती दिली.

यावेळी कोकण विभागीय आयुक्त विकास पाटील, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपवनसंरक्षक श्री.आप्पासाहेब निकत, कार्यकारी अभियंता सुखदेवे, उपसंचालक पशुसंवर्धन डॉ.सुभाष मस्के, रोहा उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसिलदार कविता जाधव, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसिलदार दिप्ती देसाई, तहसिलदार विशाल दौंडकर, महाड नगरपालिका मुख्याधिकारी रोडगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक तसेच इतर विभागाचे विभाग प्रमुख, स्थानिक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

महाड येथे स्थानिक आमदार भरत गोगावले यांच्यासह महाडच्या प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या उपस्थितीत प्रशासनातील अनेक कर्मचारी व अधिकारी केंद्रीय समितीच्या पाहणी दौऱ्यामध्ये सामील होते तर पोलादपूर येथील दौऱ्यात स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी आणि माजी सरपंच तसेच ग्रामस्थ या केंद्रीय समितीच्या अधिकाऱ्यांशी तोडक्यामोडक्या हिंदीमध्ये संवाद साधून स्वत:ची ओळख सांगण्याचा प्रयत्न करीत होते. यावेळी केंद्रसरकारने काय केले पाहिजे आणि ग्रामस्थांना काय अपेक्षित आहे, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधीने सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न केल्याचे दिसून आले. केंद्रीय समितीने नागोठणे येथील रिलायन्स येथील बैठक सभागृहामध्ये घेतलेल्या बैठकीवेळी अधिकारी स्तरावर झालेल्या चर्चेअंती योग्य तो अहवाल केंद्र सरकारला सादर करून राज्यसरकारला यासंदर्भात सुचना देण्यात येतील, असे मार्गदर्शन करण्यात आले असून या संदर्भात पुढे काय, असा सवाल स्थानिक बाधितांसह लोकप्रतिनिधींना पडला आहे.

# स्थानिक ठेकेदारांच्या थकीत बिलासाठी अदानी पोर्टच्या आगरदांडा टर्मिनलचे काम बंद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

आगरदांडा येथे सुरू असलेल्या अदानी पोर्टला व त्यांच्या कोणत्याही कामाला आमचा विरोध नाही तर तत्कालीन दिघी-पोर्ट आगरदांडा टर्मिनलवर संचालक विजय कलंत्री यांच्या डीबीएम,डीपीएल कंपनीने थकविलेली स्थानिकांची बिलं मिळावी. याकरीता अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी स्थानिकांच्या न्याय-हक्का साठी अदानी पोर्ट प्रशासनाकडे चर्चा करून मुंबई येथे गेल्या एक दीड महिने अगोदर त्यांच्या समवेत मिटिंगचे आयोजन करून चर्चा घडवून आणली होती. त्यावेळी स्थानिक कार्यकर्ते,स्थानिक पोट ठेकेदारही उपस्थित होते. दिघी-राजपुरी बंदराच्या खाडीवर दिघी-पोर्ट विकसित होत असतांना या अगोदर स्थानिक लोकांनी केलेल्या कामांचे पैसे त्यांची बिलं न मिळाल्याने अनेक वेळा काम बंद आंदोलनं झाली आहेत.

दिघी-पोर्ट अदानी ग्रुप कडे हस्तांतरित झाल्या नंतर स्थानिकांच्या जुन्या थकीत बिलां विषयी अदानी ग्रुप प्रशासन, स्थानिक कार्यकर्ते,पोट ठेकेदार व आमदार महेंद्र दळवी यांच्या थकीत बिलां विषयी चर्चा झाली होती. त्यावेळी थकीत बिलं देण्याचे वचन देऊन ते वचन न पाळता स्थानिक ठेकेदारांना तुटपुंजी रक्कम पुढे करून आपलं काम बाहेरच्या ठेकेदारांच्या मदतीने चालू केलं. अदानी पोर्टनी दिलेलं वचन पाळलं नाही. जिथं पर्यंत स्थानिकांची थकीत बिलं देत नाहीत तिथ पर्यंत काम बंद करा. असे गणेशोत्सवा दरम्यान मतदार संघाच्या दौऱ्यावर असतांना आमदार दळवी यांनी प्रत्यक्ष सांगितले त्यावेळी त्यांच्या समवेत स्वत: व शिवसेना मुरुड उप-तालुका प्रमुख मनोज कमाने, महिला संघटक शुभांगी करडे, मुरुड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा स्नेहा पाटील, आगरदांडा ग्रुप ग्रामपंचायत सरपंच रुषाली डोंगरीकर व सर्व कार्यकर्ते,पदाधिकारी उपस्थित होते. केवळ आमच्या स्थानिक ठेकेदारांची थकीत बिलं मिळावीत,आमचा पोर्टच्या कामात आताही सहकार्य आहे. पुढेही राहील.असे शिवसेना मुरुड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले. दिघी-पोर्ट संचालक विजय कलंत्री सुरवाती पासूनच झालेल्या कामात डीबीएम,डीपीएल कंपनीने स्थानिकांना कामं दिली होती. सुरवातीच्या काळात सर्व काही सुरळीत होतं. मात्र पहिल्या टप्प्यातील शेवटच्या काळात अनेक स्थानिक ठेकेदारांची बिलं मिळाली नाहीत. हळू हळू दिघी-पोर्टचं कामही मंदावलं त्या कारणाने स्थानिक ठेकेदार अडचणीत आले. आता दिघी-पोर्टचा ताबा घेणारे अदानी ग्रुपने ती थकीत बिलं देण्याचे वचन देऊन तुटपुंजी रक्कमेवरच थांबवून कामं चालू केली आणि म्हणून जिथं पर्यंत थकीत बिलं देत नाहीत.तिथं पर्यंत काम थांबवा. असे अदानी ग्रुप पोर्ट प्रशासनाला सांगितलं होतं. वास्तविक सर्व स्थानिकांनी सहभागी होऊन आपापली बिलं,कामं होई पर्यंत सहकार्य करायला हवं. या व्यतिरिक्त इतर कोणतंही स्वार्थ नाही असे स्थानिक ठेकेदारांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.



# वाहतुक पोलीसांचे ताम्हाणी घाटात असेही सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर**

**उतेखोल / माणगाव** : ताम्हिणी घाटातील अवघड वळणा-वरील माजलेले गवत काढण्याची माणगांवचे वाहतुक पोलीसांनी घेतली खबरदारी त्यामुळे पोलीसांचे असेही ''सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'' या ब्रीद वाक्याप्रमाणे सज्जनांचे रक्षण करण्यास व दुर्जनांवर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट करण्यास कटीबध्द आहेत याची प्रचिती आली. ताम्हिणी घाटातील अपघातांचा धोका लक्षात घेता पोलिसांनी प्रशंसनिय काम केले आहे.

मुंबई व पुणे वरून ताम्हिणी मार्गे कोकणामध्ये बारा महिने मोठया प्रमाणात पर्यटक येतात. घाटाच्या पायथ्याला मोठी औद्योगिक वसाहत असल्यामुळे वर्दळ कायमच असते. घाटामध्ये चढ-उतार नागमोडी वळणे असल्याने वारंवार अपघात होतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे पावसाळा आला की रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडे वाढतात, त्यामुळे वाहन चालकांना झाडांच्या फांद्या व साईड पट्टीवर माजलेले गवताचा अडथळा यामुळे समोरून येणारी वाहने नीट दिसून येत नाहीत व चढ-उतार वळणे असल्याने वाहनावर ताबा मिळवणे अवघड होऊन बऱ्याच वेळा अपघात होतात.

याचीच दखल घेत महाड वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शना खाली वाहतूक पोलीस लाल-ासाहेब वाघमोडे , निवास साबळे यांनी घाटातील ही समस्या सामाजिक कार्यकर्ते संतोष पोळेकर यांच्या सहकार्यातुन उपलब्ध झालेल्या जेसीबी चा वापर करीत, घाटातील रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडांच्या फांद्या तसेच साईड पट्टीवरील वाढलेले गवत जेसीबी च्या सहाय्याने काढून तसेच घाटामधील ब्लॅक स्पॉट वर खडी माती टाकून रस्ता वाहतुकीसाठी निर्धोक व सुरक्षित केल्यामुळे अपघाताचे प्रमाण नक्कीच कमी होऊन वाहन चालकांना सुखाचा प्रवास करता येईल.

वरवर पाहता हे किरकोळ वाटणारे परंतु घाटातून सुर-क्षीत प्रवासाचे दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे काम प्रशंसनिय असल्याने अनेक वाहन चालकांकडुन पोलीसांचे विशेष कौतुक केले जात आहे.



# मुंबई ते हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या सल्ला मसलतीची बैठक संपन्न ; स्थानिकांना कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई ते हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या पर्यावरण आणि सामाजिक विचारांसाठी सार्वजनीक सल्ला मसलती करण्यासाठीची बैठक पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रांत अधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय तळेकर, बीडीओ संजय भोये यांच्यासह बुलेट ट्रेन प्रकल्पाचे अधिकारी आणि ग्रामसेवक व शेतकरी उपस्थित होते.

बुलेट ट्रेन प्रकल्पात पनवेल तालुक्यातील २० आणि खालापूर तालुक्यातील २३ गावे बाधित आहेत. यात पनवेलमध्ये धानसर, पिसार्वे, रो-हिंजण, तळोजे पाचनंद, ओवे, खारघर, कोल्हेखार, कामोठे, कोपर, वडघर, करंजाडे, नांदगाव, कुडावे, पळ-स्पे, डेरवली, कोन, आरीवली, आष्टे, कसलखंड, भाताण या गावांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यात पनवेल आणि खालापूर या २ तालुक्यातील एकूण ९७.४६ हेक्टर जमीन या प्रकल्पसाठी लागणार आहे. रायगड जिल्ह्यातील एकूण ५३६ भूखंड यात बाधित होणार आहेत. जिल्ह्यात एकूण ३ बोगदे आहेत. पनवेलमध्ये १२.६० हेक्टर खासगी जागा आणि इतर सरकारी जमीन ३८.३२ हेक्टर असे ५०.९२ हेक्टर जागेची आवश्यकता आहे. तर खालापूरमध्ये ३५.९६ हेक्टर खासगी आणि १०.५८ हेक्टर इतर सरकारी जमीन अशी एकूण ४६.५४ हेकटर जागेची आवश्यकता आहे. फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या सभेमध्ये प्रकल्पाविषयी आणि पर्यावरण विषयी माहिती देण्यात आली. यावेळी हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून १० वर्षात पूर्ण होणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी बाधित शेतकऱ्यांनी आपल्या सूचना आणि हरकती मांडल्या. तसेच या प्रकल्पात स्थानिकांना कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी केली.

# वृद्ध महिलेचे मंगळसूत्र चोरणाऱ्या आरोपीला शिवसेनेने दिले पकडून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वृद्ध महिलेचे मंगळसूत्र चोरुन पळणाऱ्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

साई राज हाईट्स बिल्डिंगच्या समोर, सेक्टर २० येथे, एका वृद्ध महिलेचे मंगळसूत्र चोरून पाळणारा इसम बाजीराव लक्ष्मण पाटील याला शिवसेना शहर समन्वयक गिरीष धुमाळ, विभाग प्रमुख आकाश शेलार, शाखा प्रमुख रामा देवर्मनि यांनी लगेचच पाठलाग करून पकडले व पोलीसांच्या ताब्यात दिले व त्या वृद्ध महिला आणि त्यांच्या मुलीला पोलीस स्टेशनला नेले व त्या चोराच्या विरोधात तक्रार दाखल करून घेतली आणि त्या दोघींना त्यांच्या राहत्या घरी सोडले. त्या वेळेस उपशहर प्रमुख नारायण फडतरे व उपतालुका संघटक सौ टिया धुमाळ उपस्थित होते.


ॲड.मिल्का दि. घरत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.९५७/२०२१

नि.नं.७/ड

ने.ता.३०/१०/२०२१

श्री.हरि उर्फ हरिश्चंद्र मंगळ्या घरत
रा.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत कुंडेवहाळ — सामनेवाला

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे कै.मरुबाई उर्फ मारुती मंगळ पाटील यांचे वारस आहेत. कै.मरुबाई उर्फ मारुती मंगळ पाटील यांचा दि.१०/११/१९५७ रोजी मौजे : कुंडेवहाळ येथे जन्म झालेला आहे.

सदर जन्माचा दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी मे.फौजदारी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्याबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीत मे.कोर्टात हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. वर नमूद कालावधीत हरकत न आल्यास अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल



ॲड.गणेश मुकणे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.११३३/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२३/११/२०२१

श्री.अर्जुन शेखर आरोसकर
वय : ३० वर्षे, रा.सदनिका क्र.१०३, पहिला मजला, रुषभ, प्लॉट नं.१९, सेक्टर नं.०१, करंजाडे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड
सध्या रा.फ्यूचर हाईटस् ११०४, मच्छि मार्केट जवळ, मार्केट यार्ड रोड, पनवेल-४१०२०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील कै.शेखर अर्जुन आरोसकर हे दि.०५/०२/२०१६ रोजी एडवर्ड स्मारक रुग्णालय मुंबई येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार यांची आई शितल शेखर आरोसकर यांचा मृत्यू त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. ०५/०२/२०११ मु.पो.बांदा गडगेवाडी, ता.सावंतवाडी, सिंधुदुर्ग येथे झालेला आहे. कै.शेखर अर्जुन आरोसकर व अर्जदार अर्जुन शेखर आरोसकर यांच्या नावे असलेली मिळकतीचे वर्णन :-

**मौजे : करंजाडे येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील सदनिका क्र.१०३, पहिला मजला, रुषभ, प्लॉट नं.१९, सेक्टर नं.०१, करंजाडे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड. चटई क्षेत्र : २०.४७ चौ.मी.**

मौजे करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कै.शेखर अर्जुन आरोसकर व कै.शितल शेखर अर्जुन आरोसकर यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकतीची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०५/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



ॲड.गणेश मुकणे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१०६९/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२३/१२/२०२१

१) अर्चना सचिन पाटील
वय : ४० वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.ब्लॉक नं.२०, गीतांजली हौसिंग सोसायटी, लोखंडीपाडा, पनवेल, जि.रायगड
२) समृद्धी सचिन पाटील तर्फे अज्ञानपालनकर्ती अर्चना सचिन पाटील
वय : १३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.ब्लॉक नं.२०, गीतांजली हौसिंग सोसायटी, लोखंडीपाडा, पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती तसेच अर्जदार क्र.२ यांचे वडील कै.सचिन अशोक पाटील हे दि.२६/०३/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ चे सासरे व अर्जदार क्र.२ चे आजोबा कै.अशोक कृष्णाजी पाटील हे दि.२४/०३/२०१६ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कळंबोली येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ ची सासू व अर्जदार क्र.२ ची आजी कै.अमिता अशोक पाटील या दि.१७/११/२०१७ रोजी सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. कै.सचिन अशोक पाटील यांच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**ब्लॉक नं.२० थर्ड फ्लोअर गीतांजली हौसिंग सोसायटी, लोखंडीपाडा, पनवेल, जि.रायगड. ६६४ चौ.फूट बिल्टअप एरिया**

येणेप्रमाणे फ्लॅट मिळकतीचे वर्णन असून सदरहू फ्लॅट मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदाराने मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.सचिन अशोक पाटील यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आवश्यक कागदोपत्री पुराव्यासहीत मे.कोर्टात दाखल करावे. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरणमध्ये जलवाहिनी वारंवार फुटतय कशी?

कशी हा चर्चेचा विषय ठरला आहे. उरण तालुक्यातील औद्योगिक, शहर व ग्रामीण परिसरातील दिड लाख नागरिकांना एमआयडीसीच्या माध्यमातून रानसई धरणातुन पाणी पुरवठा केला जातो. जेएनपीटी टाऊनशिप - नवघर दरम्यान एमआयडीसीची तीन फूट व्यासाची पाण्याची मुख्य जलवाहिनी अचानक फुटली. या फुटलेल्या जलवाहिन्या मधुन २५ फुटांपर्यंत पाणी उडाले होते. तासभर पाणी मोठ्या प्रमाणावर उडाल्याने जेएनपीटी टाऊनशिप - नवघर दरम्यानच्या रस्त्यावर पाणीच पाणी झाले होते.

एमआयडीसीच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ व्हॉल्व बंद करून प्रथम वाया जाणारे पाणी थांबवले.दिड तासातच जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम करुन पाणी पुरवठा सुरळीत सुरू केला. उच्च दाबामुळे वेल्डिंग जॉइंडला तडा गेल्याने जलवाहिनी फुटली असल्याची माहिती एमआयडीसीचे उपअभियंता रणजित काळबागे यांनी दिली आहे. परंतु उरण शहर तसेच परिसरातील रहिवाशांना,प्रकल्पांना सुरळीत करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्याच्या एम.आय. डी.सी.च्या नव्या जलवाहिनीचे काम मागील वर्षी ठेकेदारांच्या मार्फत करोडो रुपये खर्च करून करण्यात आले.मात्र असे असतानाही वारंवार नवघर ते बोकडविरा या दरम्यानची जलवाहिनी वारंवार फुटत असेल तर या मागे गोड बंगाल काय असी चर्चा सध्या उरणात रंगू लागली आहे.

## कर्जत तालुक्यातील सावेळे येथे वयोवृद्धाचा खून

हाजीमिया मुल्ला आणि कामगार गणपत रामजी जाधव हे रक्ताच्या थारोळ्यात पडून असल्याचे दिसून आले.

पहाटे तीन वाजल्यापासून सादिक मुल्ला याने कर्जत पोलिसांना फोन लावण्याचा प्रयत्न केला,मात्र कर्जत पोलीस ठाण्याचा बीएसएनएलचा फोन बंद असल्याने सव्वा चार वाजता एका पोलिसांचा मोबाईल फोन वरून या घटनेची माहिती कर्जत पोलिसांना दिली.त्यानंतर चार वाजून २० मिनिटांनी कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुवर्णा पत्की या आपल्या स्टाफ सह सावेळे गावात पोहचल्या. तेथे रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दोघांना कर्जत येथील उपजिल्हा रुग्णलयात उपचार करण्यासाठी आणले असता ७५ वर्षीय गणपत रामजी जाधव यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. तर दुसरा जखमी व्यक्ती आरिफ मुल्ला यांच्यावर उपचार सुरू केले. या घटनेची माहिती होताच शेकडो लोक कर्जत पोलीस ठाण्यात जमले होते, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलोस अधीक्षक अशोक दुधे यांनी पहाटेच माहिती घेऊन अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांना कर्जत येथे पाठवले. त्यानंतर सकाळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक झेंडे,कर्जतच्या पोलीस निरीक्षक पत्की यांनी घटनेचा तपास सुरू केला. त्यावेळी पोलिसांनी अलिबाग येथून डॉग स्कोड देखील बोलावून घेतला आणि अज्ञात इसमांनी गणपत जाधव यांच्या खून केल्यानंतर काही धागेदोरे सोडले आहेत काय? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. कर्जत पोलीस ठाण्यात जखमी आरिफ मुल्ला यांच्या फिर्यादीनंतर गणपत रामजी जाधव यांच्या खून अज्ञात इसमांनी केला असल्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. कर्जत पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की या खून प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## नवी मुंबईकरांसाठी बेलापूर ते भाऊचा धक्का प्रवासी बोट सुरू होणार

बोटीतून प्रवासासाठी ३० मिनिट लागणार आहेत. तसेच प्रवाशांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्यामध्ये चार चाकी गाड्यांसाठी ७५ गाड्यांचे क्षमता तसेच दुचाकीसाठी ८० गाड्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे अशी माहिती देण्यात आली असून लवकरात लवकर याची ट्रायल घेण्यासाठी बोट आपण आणावी अशी विनंती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाला खासदार राजन विचारे यांनी केली आहे. खासदार राजन विचारे यांनी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मार्फत पर्यटकांसाठी या बोटीतून वातानुकूलित सेवा देण्याची विनंती केली. या पाहणी दौऱ्यात सिडकोचे मुख्य अभियंता गोडबोले, अधीक्षक अभियंता गिरी, कार्यकारी अभियंता बिरमुळे, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डचे कार्यकारी अभियंता मेटकर, कॅप्टन इंगळे, प्रादेशिक बंदर अधिकारी तसेच बेलापूर जिल्हाप्रमुख विठ्ठल मोरे, उपजिल्हाप्रमुख दिलीप घोडेकर, मिलिंद सुर्याराव, रोहिदास पाटील, शहर प्रमुख विजय माने, उपशहर प्रमुख सोमनाथ वास्कर, विशाल कोळी, रामा शेठ कोळी, विषाल विचारे व इतर शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धुपप्रतिबंधक बंधाऱ्याची दुर्दशा

दृष्टीने ठीक ठिकाणी बसवण्यात आलेल्या कचरा कुंड्या अस्ताव्यस्त अवस्थेत आहेत. समुद्रकिनारी उतरण्यासाठी बसवलेल्या फरश्या समुद्राच्या पाण्याच्या जोरदार लाटांमुळे उद्धवस्त झालेल्या आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने समुद्रकिनारी बंधाऱ्यावर बसवण्यात आलेले सी सी टी व्ही कॅमेरे देखील निसर्गचक्रीवादळापासून लुप्त झालेले दिसत आहेत. बंधाऱ्यावर स्टॉल उभारून ते भाडे तत्वावर देऊन पालिका प्रशासनाला एक उत्पन्नाचे साधन म्हणून बंधाऱ्यावर अंतरा अंतरावर दहा स्टॉल उभारले आहेत. हे स्टॉल भाडेतत्त्वावर देण्यापूर्वीच त्यांची झालेली दुर्दशा म्हणजे जनतेच्या पैश्याची उधळण असल्याचं दिसत आहे. प्रत्येकी स्टॉलसाठी अंदाजे लाख ते दीड लाख रुपये पालिका प्रशासनाने खर्च केले असावेत. सद्यस्थितीत निसर्गचक्रीवादळात पडलेले स्टॉल अद्याप पूर्ववत उभारून देखील घेतले गेले नाहीत. स्टॉल बनून देणाऱ्या कंपनीकडून प्रत्येक स्टॉलमध्ये पंखे बसवण्यात आले होते. स्टॉलच्या शटरचे दरवाजे उघडून त्यातील पंखे देखील चोरीला गेल्याच दिसत आहे. मात्र याकडे पालिका प्रशासनाचे अक्षम्य दूर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे दिले घोणस सापाला जीवदान

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील रहिवासी भिकेश चोरघे यांच्या बागायतीमधील विहिरीमध्ये घोणस जातीचा सुमारे सहा फूट लांबीचा विषारी साप पडलेला आढळून आला.

प्रथमदर्शनी चोरघे कुटुंबियांना तो अजगर असल्याचे वाटले त्यांनी मुरुड मधील सर्पमित्र संदीप घरत यांना पाचारण केले असता त्यांनी त्या सापाचे निरीक्षण केले व तो साप अत्यंत विषारी प्रजातीतील घोणस असल्याचे सांगितले. घरत यांनी त्या सापाला विहिरीतून सुखरूप बाहेर काढून मुरुड वनखात्याकडे सुपूर्द केला, वनअधिकाऱ्यांनी त्यास पिंजऱ्यामध्ये बंदिस्त केला असून गुरुवारी फणसाड अभयारण्यात सोडून देण्यात येणार आहे, नांदगाव, उसरोली परिसरातील गावे विस्तीर्ण असलेल्या फणसाड अभयारण्याला लागून असल्याने गावांमध्ये बऱ्याच वेळी विविध जातीचे साप आढळून येत असल्याचे सर्पमित्र संदीप घरत यांनी सांगितले.

## पॅन इंडिया अवेअरनेसच्या निमित्ताने शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने पॅन इंडिया अवेअरनेसच्या निमित्ताने शिबिराचे आयोजन पनवेल तहसील कार्यालय येथे ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.

७ ऑक्टोबर रोजी स्कीम्स ऑफ लीगल एड सर्विसेस याबाबत सीनियर सिटीजन या विषयावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पनवेल बार असोसिएशनचे वकील अनिल जाधव मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरा करता उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कोरोना विषयक सर्व नियमांचे पालन करूनच नवरात्रोत्सव साजरा करावे : मधुकर भटे

**दै.रायगड नगरी । उरण**

यंदाच्या नवरात्रोत्सवावरही कोरोनाचे सावट आहे. सोशल फिजिकल डिस्टन्स नागरिक पाळत नसल्याने कोरोना रोगाच्या प्रसाराला आमंत्रण मिळत आहे. त्या अनुषंगाने नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही नवरात्रोत्सवाच्या मंडळाने ढोल, बँजो वाजवू नयेत. मिरवणूका काढू नयेत. गर्दी होईल असे कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन करू नयेत. ध्वनी प्रदूषणांच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सोशल फिजिकल डिस्टन्स पाळावे, मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा. कोरोना रोगाचा प्रसार टाळण्यासाठी कोरोना बाबतचे सर्व नियम नवरात्रोत्सवाच्या मंडळानी, मंडळाच्या सर्व पदाधिकारी सदस्यांनी पाळावेत असे स्पष्ट सूचना न्हावा शेवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांनी नवरात्रोत्सव मंडळाना दिले आहेत. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर न्हावा शेवा पोलीस स्टेशन हद्दीतील जसखार, जे एन पी टी, डोंगरी, बेलपाडा, न्हावा, गव्हाण, सोनारी, उलवे आदी विविध ठिकाणाचे नवरात्रोत्सव मंडळ व पोलीस प्रशासन यांची संयुक्त बैठक न्हावा शेवा पोलीस स्टेशन मध्ये संपन्न झाली. यावेळी कामगार नेते महादेव घरत यांच्यासह पोलीस स्टेशन हद्दीतील विविध नवरात्रोत्सव मंडळाचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# नवरात्र उत्सवात होणार कुलदैवताची घटस्थापना

**दै.रायगड नगरी । पेण**



महाराष्टात नवरात्र उत्सवाला महत्वाचे स्थान असुन ग्रामिण तसेच शहरी भागात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या मध्ये काही ठीकाणी मंदीरात घटस्थापना केली जाते तर सार्वजनिक मंडळातर्फे मुर्तीची स्थापना करुन घटस्थापना केली जाते. तर प्रत्येक कुटुंबामध्ये कुलदैवतांची घटस्थापना करण्यात येते.

महाराष्टातील समाज कुटुंबामध्ये विस्तारलेला आहे. या मध्ये प्रत्येक भावकीचे कुलदैवत आसतात नवरात्र उत्सवात हे सर्व भावबंद मंडळी एकत्र येवुन हा उत्सव साजरा करतात. या वेळी कुंटुबात आसलेले भावबंद मंडळी कुठेही राहायला गेली असली तरी ती नवरात्र उत्सवात एकत्र येतात त्यामुळे कुंटुबाची एकता पाहायला मिळतो व कुंटुबाचा एकी वाढते. भावकी मधील ओळख वाढते. नविन पिढीला आपले भावबंद कोण आहेत व ते कुठे राहातात कोणता व्यवसाय करतात यांची माहिती मिळते. पुढे येणाऱ्या सुखदुखात सर्वजण सहभागी होतात व कुंटुबाची पुढील दिशा ठरवली जाते. ऐकमेकामध्ये सहकार्याची भावना निर्माण होते. नवरात्र उत्सवात काही ठिकाणी कुलदेवताची घटस्थापना कुंटुबातील भावकीतील प्रत्येकांचे घरात आळीपाळीने साजरा होत आसल्याने हा उत्सव साजरा करण्याची संधी प्रत्येकाला मिळते. या नवरात्र उत्सव काळात भावबंद मंडळी एकत्र येत आसल्याने विचारांची देवाण घेवाण तर होतेच तर या वेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आसल्याने कुटुबांतील लहानापासुन मोठ्यापर्यत आपली कला दाखविण्याची संधी मिळते.

# नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाळसईतील महिलांचे ग्रामस्वच्छता अभियान

**दै.रायगड नगरी । वाकण**

गणेशोत्सव संपल्यानंतर आता रायगड जिल्ह्यात सर्वांना वेध लागले आहेत ते नवरात्रौत्सवाचे. संपुर्ण रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव सणावर कोरोनाचे कोणतेही सावट न येता सर्वत्र गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

तसेच गुरुवारी घटस्थापना होऊन नवरात्रौत्सवाची सुरुवात होणार आहे. याच नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाळसई (ता.रोहा) येथील महिलांनी ग्रामस्वच्छता अभियान उपक्रमाअंतर्गत संपूर्ण बाळसई गावातील तसेच आजुबाजुच्या परिसरातील साफसफाई करण्याचा उपक्रम हाती घेतला होता. बाळसई गावासह आजुबाजुच्या परिसरातील अनेक महिलांनी साफसफाई करुन सर्वच परिसर स्वच्छ केला.

श्री. बेलजाई महिला मंडळ बाळसई तसेच गावातील ५ ते ६ बचत गटातील असणाऱ्या सर्व महिलांनी मंगळवार( दि.५) रोजी बाळसई गावाची ग्रामदेवता श्री. बेलजाई माता मंदिर परिसर, श्री.दत्त मंदिर परिसर, तसेच बाळसई बस थांबा ते बेलजाई मंदिराकडे जाणाऱ्या संपूर्ण रस्त्यावर साफसफाई करण्यात आली.

# बापदेवपट्टी गावाचे तातडीने पुनर्वसन करा ; आदिती तटकरे यांच्याकडे रासपची मागणी



**दै.रायगड नगरी । माणगाव**

तालुक्यातील करंबेळी ग्रामपंचायत हद्दीतील बापदेवपट्टी हे गाव गेल्या २० वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहे. या ठिकाणी पावसाळ्यात मोठं मोठया दरडी पडत असून येथील ग्रामस्थांना जीव मुठीत धरून जगावे लागत आहेत.

हे गाव गेल्या २० वर्षांपासून पुनवर्सनाच्या प्रतीक्षेत असून यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख संतोष ढवळे धनविकर यांनी रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांची बाबदेवपट्टीतील ग्रामस्थांसह भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन येत्या २० आक्टोबर पर्यंत या गावाच्या पुनर्वसन प्रक्रियेस सुरूवात करावी अन्यथा राष्ट्रीय समाज पक्ष आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा संतोष ढवळे धनवीकर यांनी दिला आहे.

तर या निवेदनात कडापूर ते धनवी मार्गे जोर रस्ता आणि खर्डी खुर्द ते हुंबरी रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली असून या रस्त्यांना तात्काळ निधी उपलब्ध करून रस्ता दुरुस्त करावा अशी मागणीही राष्ट्रीय समाज पक्षाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख- संतोष ढवळे धनविकर यांनी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी सोबत राष्ट्रीय समाज पक्षाच्या नेत्या पुष्पा ढवळे , माणगाव तालूका अध्यक्ष रविंद्र सुतार, माणगाव तालूका आल्पसंख्यांक अध्यक्ष सिकंदर येस्वीकर, बाळाराम ढवळे ,चंद्रकांत झोरे, किरण ढवळे , पिंटेश कोकरे, कुंभे ग्रा. पं. सदस्य व रा. स. प नेते अंकुश झोरे, संदीप झोरे, गणेश गोरे, प्रकाश झोरे उपस्थित होते.

# खारघरमध्ये कचऱ्याचे ढीग; नागरिकांमध्ये नाराजी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहतीत हिंवताप, डेंग्युच्या आजारामध्ये वाढ होत असताना पनवेल महापालिकेकडून 'सिडको'च्या राखीव भूखंडावर टाकण्यात येत असलेला कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून पसरणाऱ्या दुर्गंधी मुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.



पनवेल महापालिका आरोग्य विभागाकडून परिसरातील कचरा घंटागाडी द्वारे गोळा करुन पेठपाडा मेट्रो स्थानकालगत असलेल्या 'सिडको'च्या राखीव भूखंडावर टाकला जातो. त्यानंतर तो कचरा वाहन अथवा घंटागाडी द्वारे घोट येथील डम्पिंग ग्राऊंड याठिकाणी नेला जातो. मात्र, सदर कचरा महापालिकेकडून वेळेवरच उचलला जात नसल्यामुळे कचऱ्यातून पसरणाऱ्या दुर्गंधीमुळे सेक्टर- ३४, ३५ आणि जवळच असलेल्या ओवापेठ मधील रहिवासी त्रस्त आहेत. तसेच कचऱ्यामुळे परिसरात वुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा त्रास पहाटे चालण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना होत आहे. तर अनेक वेळा कचऱ्याला आग लागण्याचे प्रकार घडले आहे. 'सिडको'कडे घनकचरा असताना दैनंदिन कचरा द्वारे घोट येथील डंपिंग ग्राऊंडमध्ये घेवून जात असे. मात्र, 'सिडको'ने महापालिकेकडे घनकचरा प्रकल्प हस्तांतरीत केल्यानंतर अनधिकृतपणे कचरा टाकला जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली असून महापालिका आयुक्तांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकाकडून केली जात आहे. याविषयी महापालिकेच्या घंटागाडीचे काम पाहणारे राजेंद्र गोसावी यांच्याशी संपर्क केला असता, नंतर फोन करतो असे सांगून त्यांनी फोन कट केला.


### जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी खालील मिळकत विकसनाकरिता घेण्याचे मान्य केले आहे. खालील वर्णनाची मिळकत कै.प्रभाकर भिवा पाटील व त्यांचे वारस १) श्री.दिनेश प्रभाकर पाटील, २) श्री.गणेश प्रभाकर पाटील यांच्या ताबेकब्जात असल्याने त्यांचेकडून आमचे अशिलांनी विकसन करण्यासाठी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**संपादीत मिळकतीचे वर्णन**

**मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | अॅवार्ड नं./युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| नावडे | १७१ बी | १७२ | १ | ०-७-१२ |
| | | १७१ | ५ | ०-८-० |
| | | १७१ | ४ | ०-४-० |
| | | १६८ | १ | ०-३३-८ |
| | | १८१ | १ | ०-१५-८ |
| | | १९३ | ५ | ०-८-८ |
| | | २३१ | ६ | ०-१६-८ |
| | | १९३ | ३ | ०-१३-० |
| | | २३० | ६ | ०-३१-१२ |

सदरहू संपादीत मिळकतीचे बदल्यात सिडको प्राधिकरणाकडून १२.५ टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको फाईल नं.१०० याद्वारे दुसरेपक्षी यांना सिडको कडील मौजे : नावडे, भूखंड क्र.४०, से.४५ नोड, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे खालील वर्णनाचा भूखंड इरादीत करण्यात आलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे/नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्रं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| नावडे | ४५ | ४० | १२५० चौ.मी. |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या विकसन करण्याचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०७/१०/२०२१

**सही/-**
**अॅड.शशिकांत काळू म्हात्रे**
**तळमजला, दत्तचार्य अपार्टमेंट,**
**पायोनिअर सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, हॉटेल युविका जवळ,**
**पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९९२०३८४४२४**



राव साहेब

अॅड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३०९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/११/२०२१

१) श्री.शरद रामा पाटील
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.पंडित रामा पाटील
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
१ ते २ रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल
३) श्री.अनंत रामा उर्फ रामचंद्र पाटील
वय : ७४ वर्षे, धंदा : शेती
रा.धोंडपाडा, पो.कोप्रोली, ता.पेण, जि.रायगड
४) श्रीमती.मंदा रोहिदास ठाकूर
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
रा.रुम नं.२०१, रामेश्वर अपार्टमेंट,
दिवा (प.) ता.ठाणे, जि.ठाणे
५) श्रीमती.हौसाबाई विश्वनाथ मुंगाजी
वय : ६१ वर्षे, धंदा : शेती
रा.ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ यांचे वडील कै.रामा महादू पाटील हे दि.२५/१०/२०१४ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. कै.रामा महादू पाटील यांच्या पत्नी पार्वतीबाई रामा पाटील या दि.२८/०२/२०१३ रोजी मयत झाल्या आहेत.

कै.रामा महादू पाटील यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १६९/८७ | २२५ | १ | ०-२२-५ |
| नावडे | १६९ | १८६ | ३ | ०-४२-० |
| नावडे | १६८ | २०० | १० | ०-१०-० |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अॅवॉर्ड हा कै.रामा महादू पाटील यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.रामा महादू पाटील यांचे वारसदार या नात्याने कै.रामा महादू पाटील यांचे हिश्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.रामा महादू पाटील यांचे हिश्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ६/१०/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.भाकरे साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.निलम लक्ष्मण पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५०६/२०२१
नि.नं.१९/ड
ने.ता.१०/११/२०२१

१) श्री.राजेश बाबुराव देशमुख
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.संतोष बाबुराव देशमुख
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
अर्जदार क्र.१ व २ रा.मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.अर्चना संजय पासलकर
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.यशोदिप सोसायटी, संघर्ष चौकाजवळ,
वार्जे मालवाडी, पुणे शहर, ता.जि.पुणे-४११०५८ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील बाबुराव रामभाऊ देशमुख हे दि.२९/०६/२०२० रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई सुवर्णा बाबुराव देशमुख या दि.०७/०५/२०२१ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि. यांनी साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केल्या असून सदर जमीन मिळकतींचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे :

**अ) संपादीत मिळकतींचे वर्णन**

**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण | १५९ | ३३७ | ५ | ०-२२.५ | ३५० |
| | | | ३३७ | १० | ०-१६.३ | |

ब) तसेच मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.२७४/५ क्षेत्र ०-७३.० ही मिळकत देखील महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि. यांनी साडेबावीस टक्के भूखंड योजनेंतर्गत नेरुळ-बेलापूर-सीवूड-उरण रेल्वे प्रकल्पाकरिता संपादीत केली असून सदर जमीन मिळकतींचे संपादनापोटी खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेला भूखंड वाटप केलेला आहे. सदर भूखंडाचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे :

**भूखंडाचे वाटप**

**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

**सिडको संचिका क्र.उलवे-१५**

| नोड | सेक्टर नंबर | भूखंड क्रमांक | एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे | २६ | १३६ | ११५० |

क) तसेच मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.३३८/११/अ/१, क्षेत्र ०-२८.०० ही मिळकत देखील आहे.

आता वर नमूद मिळकतींच्या संपादनापोटी मिळणारे भूखंड व इतर लाभ मयत बाबुराव रामभाऊ देशमुख व सुवर्णा बाबुराव देशमुख यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदार व त्यांचे इतर सहमालक यांस मिळणेकरिता अर्जदारांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०६ माहे ऑक्टोबर सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



अॅड.तृप्ती ग. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.अतिरिक्त जिल्हा न्यायालय यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.७१/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.१५/११/२०२१

श्री.आप्पा शांताराम पाटील, वय : ४४ वर्षे
रा.मु.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
१) कु.सोहम मनोहर पाटील, वय : १५ वर्षे
२) कु.भूमी मनोहर पाटील, वय : १२ वर्षे
यांचे पालनकर्ते

अर्जदार मे.कोर्टास कळवितात की,

१) अर्जदार हे वरील पत्यावर कायमस्वरुपी वास्तव्यास असून अर्जदार यांची स्थावर व जंगम मालमत्ता वरील पत्यावर व या न्यायालयाचेच अधिकार क्षेत्रात म्हणजे मु.तळोजे येथे आहे. सबब सदरचा अर्ज चालविण्याचे अधिकार क्षेत्र संपूर्णतः या न्यायालयास आहे.

२) सदर अर्जदार यांचे भाऊ मनोहर शांताराम पाटील हे दि.९/६/२०१८ रोजी मु.ऐरोली येथील नॅशनल बर्न सेंटर, ता.ठाणे येथे मयत झाले आहेत. तसेच मयत मनोहर शांताराम पाटील यांची पत्नी आनंदीबाई मनोहर पाटील या दि.१८/०९/२०१४ रोजी मु.तळोजे मजकूर येथे मयत झाल्या आहेत. मयत व्यक्ती ज्यावेळी मृत झाल्या त्यावेळी त्यांना अनुक्रमे १) कु.सोहम मोहर पाटील, वय : १५ वर्षे, २) कु.भुमी मनोहर पाटील, वय : १२ वर्षे अशी अपत्ये आहेत. सदरील अपत्ये आजमितीस अज्ञान असल्याने त्यांचा सांभाळ अर्जदार हेच करीत आहेत. सबब अज्ञान मुलांचे कायदेशीर पालकत्व मिळवण्यासाठी अर्जदार यांना सदरचा अर्ज दाखल करण्याचे कारण घडले आहे.

३) मयत आनंदीबाई मनोहर पाटील यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे खालील मिळकती ७/१२ सदरी नोंद होत्या व आहेत. त्या खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | २४/२ ब | ०.०४.०० | ०.२५ |
| २ | २४/३ | ०.०७.५० | १.१२ |
| ३ | ३१/४ | ०.०१.५० | ०.०९ |
| ४ | ४८/६ | ०.१९.०० | ०.६३ |
| ५ | ४/१७ | ०.०१.०० | ०.०३ |
| ६ | ४/१६ | ०.०२.०० | ०.०६ |

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | ७९ | २.३०.९० | १४.१९ |

वरील मिळकतीचे ७/१२ सदरी मयत मनोहर शांताराम पाटील यांचे मृत्यूनंतर मौजे : तळोजे मजकूर, फेरफार क्र.२०१७ दि.११/१२/२०२० रोजी नोंद झाला असून कु.सोहम मनोहर पाटील व भूमी मनोहर पाटील यांचे नावे ७/१२ सदरी नोंद झाली आहे.

४) सदर वर उल्लेखित मिळकती या अज्ञान मुलांची आई मयत आनंदीबाई मनोहर पाटील यांचे वडिलांकडून म्हणजेच मयत काळू (काळुराम) सिंधू पाटील यांचेकडून मयत आनंदीबाई पाटील यांना मुलगी म्हणून वारसाहक्काने आल्या आहेत. तशी मयत आनंदीबाई पाटील यांचे नावाची नोंद ७/१२ सदरी झाली आहे. सबब आनंदीबाई पाटील मयत झाल्यानंतर त्यांचे पश्चात त्यांचे वारसाची नोंद ७/१२ सदरी फेरफार नोंदीने झालेली आहे. सबब मयत व्यक्तीचे वारसांची नोंद झाली आहे. आजमितीस वर उल्लेखित मिळकतीचे ७/१२ सदरी अज्ञान मुलांचे नाव नोंद झाले आहे. अज्ञान मुलांची नावे ७/१२ सदी नोंद झाल्याने त्यांचे तर्फे मिळकतीची सर्व व्यवस्था बघण्याचे पुढील कामकाज करणेकरिता अज्ञान मुलांचे पालकत्व मा.न्यायालयाकडून मिळणेकरिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

५) येणेप्रमाणे जमीन मिळकती असून वरील मिळकतीबाबत अर्जदाराने हिंदू मायनॉरिटी अॅण्ड गार्डीयनशिप अॅक्ट १९५६ व गार्डीयन अॅण्ड वॉर्ड अॅक्ट १८९० नुसार अज्ञान मुलांचे पाकलत्व मिळणेकरिता व त्यांचे नावे मिळणाऱ्या मिळकतीचे संरक्षण करणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी वरील पाकलत्व मिळणेबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे पालकत्व दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज रोजी दि.६/१०/२०२१ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **अतिरिक्त जि.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **अतिरिक्त जि.न्याया, पनवेल**

# संक्षिप्त...

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–

गुरूवार दि.०७ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ८.३० वा. सुतारवाडी येथून शासकीय वाहनाने पाली ता. सुधागड कडे प्रयाण, सकाळी ९.०० वा. पाली येथे आगमन व श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिरास सदिच्छा भेट, सकाळी ९.३० वा. पाली, ता. सुधागड येथून शासकीय सुतारवाडी,ता. रोहा कडे प्रयाण, सकाळी १०.०० वा. सुतारवाडी, ता. रोहा येथे आगमन व राखीव.दुपारी १२.०० वा. सुतारवाडी, ता. रोहा येथून शासकीय वाहनाने चिंचोली तर्फे आतोणे ता. रोहा कडे प्रयाण,



वाहनाने सुतारवाडी, ता. रोहा कडे प्रयाण, दुपारी १२.३० वा. चिंचोली तर्फे आतोणे ता. रोहा येथे आगमन व देवस्थ जिल्हा परिषद शाळा भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती, दुपारी १.३० वा. चिंचोली तर्फे आतोणे ता. रोहा येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी, ता. रोहा कडे प्रयाण, दुपारी २.०० वा. सुतारवाडी, ता. रोहा येथे आगमन व राखीव.

दुपारी २.३० वा. सुतारवाडी, ता. रोहा येथून शासकीय वाहनाने ता. महाड कडे प्रयाण, दुपारी ४.०० वा. महाड येथे आगमन व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे शासकीय निवासी इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती (स्थळ:– तालुका पोलीस स्टेशन शेजारी, महाड, जि. रायगड) (संदर्भ:– श्री अशोक दुधे, पोलीस अधिक्षक, रायगड), सायंकाळी ५.३० वा. महाड येथून शासकीय वाहनाने रोहा कडे प्रयाण, सायंकाळी ७.०० वा. रोहा येथे आगमन व श्री धावीर महाराज पालखी सोहळा पूर्वतयारी व आढावा बैठकीस उपस्थिती (स्थळ :– रोहा नगर परिषद कार्यालय, रोहा, जि. रायगड), बैठकीनंतर रोहा येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी, ता. रोहा कडे प्रयाण, सुतारवाडी, ता. रोहा येथे आगमन व राखीव.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# अंबा नदीचे पाणी झाले गढूळ; पालीकरांना माती व चिखल मिश्रित पाण्याचा पुरवठा

## सुमारे १२ कोटींची शुद्ध नळपाणी पुरवठा योजना लालफितीत

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : अष्टविनायकांपैकी एक तिर्थक्षेत्र असलेल्या पाली शहराला अंबा नदिचे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता पुरविले जाते. २–३ दिवसांपासून अंबा नदीचे पाणी प्रचंड गढूळ झाले आहे. परिणामी पालीकरांना माती व चिखल मिश्रित पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



पालीतील तब्बल १५ हजाराहून अधिक लोक अंबा नदीच्या पाण्याचा वापर पिण्यासाठी व वापरासाठी करतात. शोकांतिका म्हणजे पाली शुद्ध नळपाणी पुरवठा योजना मागील १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित आहे. सद्यस्थितीत तब्बल १२ कोटींची शुद्ध नळपाणी योजना लालफितीत अडकली आहे. ही रक्कम आणखी वाढण्याची शक्यता देखील आहे.

सध्या अंबा नदीच्या पाण्यात गाळ व चिखलाचे प्रमाण अधिक वाढले आहे. तर नंतर मोठ्या प्रमाणात हिरवळ व शेवाळ असते. कधीकधी साप, मासे, शिंपले नळाद्वारे थेट येतात. तसेच नाले व गटारांमधील प्रदुषित सांडपाणी, रासायनिक कंपन्यांमधील टाकऊ रसायन हे आंबा नदीत सोडले जाते. या बरोबरच कचरा आणि घाण देखिल साठते. नदीवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदीत निर्माल्य देखील टाकले जाते. यामुळे अंबा नदीचे पाणी प्रचंड प्रमाणात प्रदूषित व खराब होते. या सर्वांमुळे पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. असे पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी बहुसंख्य नागरिक अधिकचे पैसे खर्च करुन पिण्याच्या पाण्यासाठी बाटलीबंद पाण्याचा आधार घेत आहेत.

शासनाने केलेल्या २००८ – ०९ च्या सर्व्हेनुसार पालीची लोकसंख्या व पालीत दररोज येणार्या भाविक व पर्यटकांच्या संख्येनुसार शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेचे नियोजन केले होते. एकूण ७ कोटी ७९ लाखाचा निधी व १० टक्के लोकवर्गणी द्वारा नळयोजना उभी राहणार होती. परंतू राजकीय श्रेयवादामध्ये हि योजना रखडली गेली. त्याबरोबर १० टक्के लोकवर्गणीचा प्रश्न देखिल होता. दरम्यानच्या काळात पालीला ''ब'' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा मिळाला आहे. त्यानंतर शुद्ध नळपाणी पुरवठा योजनेसाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. लोकवर्गणीची अट शिथील करण्यात आली आहे. पण अजुनही हि योजना कार्यान्वित होऊ शकलेली नाही. सर्वच राजकिय पक्ष व त्यांचे पुढारी या योजनेचे निवडणूकी पुरते भांडवल करतांना दिसतात.

अंबा नदिजवळील जॅकवेलमध्ये असलेल्या पंपांद्वारे पाणी सरगडाच्या पायथ्याशी असलेल्या चार साठवण टाक्यांमध्ये सोडले जाते व तेथून सर्व पालीत पाणी पुरवठा केला जातो. तर काही भागात नदीतून थेट पाणी पुरवठा केला जातो. मात्र जॅकवेल ते साठवण टक्या यांच्या दरम्यानचे मोठे अंतर, वाहिन्यांचा छोटा आकार, वारंवार फुटणाऱ्या लहान, जुन्या व जिर्ण झालेल्या जलवाहिन्या, साठवण टाक्यांची दुरवस्था, सतत बिघडणारे व अपुऱ्या क्षमतेचे पंप, जॅकवेलमध्ये गाळ साठणे, जुने वॉल फुटणे, मुख्य जल वाहिनीला जोडलेल्या इतर वाहिन्या, वारंवार खंडित होणारा विज पुरवठा व अपुरे कर्मचारी अशा असंख्य कारणांमुळे पालीत नेहमी पाणी टंचाई भेडसावते. नळपाणी योजना झाल्यास ही समस्या निकाली निघू शकते.

### पोलादपूर तालुक्यातील विद्युत पुरवठा सुरळीत करा अन्यथा...

# शेकापक्षाकडून महावितरणला १० दिवसांची मुदत

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्यात गेल्या अनेक महिन्यांपासून विद्युतप्रवाह तासाभरात सरासरी दोन मिनिटाला एकवेळ बंद होऊन सुरू होत असल्याच्या प्रकारामुळे अनेकांची विद्युत उपकरणे नादुरूस्त होत असल्याने भारतीय शेतकरी कामगार पक्षाकडून बुधवारी सर्वपित्री आमावस्येच्या मुहूर्तावर महावितरणला पोलादपूर तालुक्यातील विद्युतपुरवठा सुरळीत करा अन्यथा १० दिवसांनंतर मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्यात येईल, असा सज्जड इशारा देण्यात आला आहे.



पोलादपूर तालुक्यातील विद्युतपुरवठ्यासंदर्भात सर्वच राजकीय पक्षांचे दूर्लक्ष सुरू असल्याने महावितरणच्या अभियंत्यांचे चांगलेच फावले आहे. पोलादपूर तालुक्यातील विद्युत ग्राहकांचे प्रश्न सोडविण्यापेक्षा स्थानिक पुढारी आणि राजकीय पक्षांकडून आगामी रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेऊन आपआपल्या वर्चस्वाखालील ग्रामपंचायतींची बिले थकीत असूनही रस्त्यावरील विद्युतपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांचे लांगूलचालन करीत आहेत. यामुळे काही ग्रामपंचायतीमध्ये रात्रीचे पथदिवे प्रकाशित होत असले तरी दिवसरात्र ग्राहकांच्या घरातील विद्युत उपकरणांमध्ये विजेच्या लपंडावामुळे मोठ्या प्रमाणात बिघाड होत आहे. यामुळे पोलादपूर तालुका शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस एकनाथ गायकवाड, विभागीय चिटणीस योगेश महाडीक, बोरावळे सरपंच वैभव चांदे, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य चंद्रकांत सणस, अल्पसंख्यांक जिल्हा सेल समीर चिपळूणकर व यासीन करबेळकर, रवींद्र गायकवाड, नासिर नाडकर, इम्तियाज तांबे, प्रमोद महाडीक, रझाक तुडीलकर, राशीद काझी, संकेत जैतपाल, इम्रान तिवडेकर, मसूद तिवडेकर, हर्षल सातपुते, प्रमोद शिंदे, अस्लम करबेलकर आदी कार्यकर्त्यांनी पोलादपूर महावितरणच्या कार्यालयामध्ये जाब विचारण्याचा प्रयत्न केला असता महावितरणचे सर्व अभियंता व जबाबदार अधिकारी कार्यालय सोडून पसार झाले. यावेळी शेकापक्षाच्या कार्यकर्त्यांनी पसार होणाऱ्या अभियंत्यांसह महावितरणला येत्या १० दिवसांमध्ये पोलादपूर तालुक्याचा विद्युतपुरवठा सुरळीत न झाल्यास मोठ्या उग्र स्वरूपाचे जनआंदोलन उभारण्याची तबी निवेदनाद्वारे दिली. यावेळी महावितरणकडून प्रसाद कुलकर्णी यांनी निवेदन स्विकारले.

# पोटच्या मुलाला विषारी द्रव्य पाजून स्वत:ही केले विष प्राशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल भागात राहणाऱ्या एका महिलेने विषारी द्रव्य पिऊन आपल्या २ वर्षाच्या लहान मुलाला देखील विषारी द्रव्य पाजल्याने यात तिच्या २ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेत सदर महिला बचावली असून पनवेल शहर पोलिसांनी तिच्यावर मुलाची हत्या केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. बहिणीच्या पतीने तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिल्याने तिने अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलल्याचे उघड झाले आहे. सदर महिलेवर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु असून ती बेशुध्दावस्थेत आहे.

सदर घटनेतील आरोपी महिलेचे नाव सरितादेवी महेंद्रवुमार (२०) असे असून मृत झालेल्या तिच्या २ वर्षीय मुलाचे नाव ऋषभ असे आहे. आरोपी सरितादेवीचे आपल्या सख्या बहिणीचा पती राजवुमार महंतो याच्या सोबत प्रेमसंबंध होते. त्यामुळे सरितादेवीने त्याच्या पाठीमागे लग्न करण्यासाठी तगादा लावला होता. मात्र, राजकुमार याने तिच्यासोबत लग्न करण्यास नकार दिल्याने संतापलेल्या सरितादेवी हिने रागाच्या भरात स्वत: विषारी द्रव्य प्राशन केले. त्यानंतर तिने आपल्या दोन वर्षाच्या मुलाला देखील विषारी द्रव्य पाजले. सदर घटनेत सरितादेवीचा मुलगा ऋषभ मृत झाला आहे. तर ती स्वत: अत्यवस्थ झाल्यामुळे तिला उपचारार्थ एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांनी सरितादेवी विरोधात हत्येचा गुमातन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

# नैना विरोधी पाली, मोहो, शिवकर येथे सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नैना विरोधात जनजागृतीपर तालुक्यातील पाली, मोहो, शिवकर या गावांमध्ये शेतकऱ्याच्या सभा झाल्या. या सभेस मोठ्या संख्येने शेतकरी बांधव आणि नागरिक उपस्थित होते. या वेळेस मार्गदर्शन करण्यासाठी ॲड सुरेश ठाकूर, वामन शेळके, नामदेव फडके, राजेश केणी, शेखर शेळके, एम सी पाटील, अनिल ढवळे, बाळाराम फडके, राज पाटील, नरेंद्र भोपी, डी के भोपी, बबन फडके, गजानन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



राजेश केणी यांनी बोलताना कोणत्याही परिस्थितीत या जमिनी नैनाला देणार नसल्याचे स्पष्ट केले, ही योजना ऐच्छिक असल्याचं शासनाच्या वतीने म्हंटल असल्याचं सांगितलं, गेल्या ८ वर्षात खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रयत्न सरकार करत असल्याचे सांगत या जमिनीत आमच्या आईवडिलांनी, पूर्वजांनी घाम गाळला आहे, रक्त सांडलं आहे इथे कोणाला थारा दिला जाणार नसल्याचं राजेश केणी यांनी सांगितलं. पाली, मोहो गाव ही वारकरी संप्रदायाचे माहेरघर असल्याचे सांगत वाईट विचारांवर वार करणारे ते वारकरी या उपाधी प्रमाणे अन्यायकरी नैनाचा सामना करण्यासाठी वारकरी सांप्रदाय नक्की पाठीशी राहील हा विश्वास राजेश केणी यांनी व्यक्त केला.

शेखर शेळके यांनी आमदार बाळाराम यांनी नैना विषयक घेतलेल्या बैठकीची कल्पना शेतकऱ्यांना दिली, शेकाप कार्यालयात झालेल्या बैठकीत आर्किटेक्ट अतुल म्हात्रे यांच्या माध्यमातून प्रोजेक्टरवर महापालिका, नैना, एमएसआरटीसी, एमएमआरडीए, सिडको, महापालिका या वेगवेगळ्या आस्थापना मधून मिळणार FSI आणि खर्चाची माहिती शेतकऱ्यांना दिली होती. ती आठवण देखील शेखर शेळके यांनी करून दिली. नामदेव फडके यांनी अन्यायकारी नैना विरुद्ध आपली वज्रमुठ अधिक बळकट करण्यासाठी जास्तीत जास्त मेहनत घेण्याची गरज असल्याचे सांगितले. ॲड सुरेश ठाकूर यांनी नैना विषयक लढाई ही संघर्षाबरोबरच कायदेशीर लढाई देखील लढण्यास सज्ज असल्याचे मांडले. गेल्या ५१ वर्षात सिडको ने १२.५०% देऊ शकली नाही. हे वास्तव मांडले. नैना प्रकल्पासाठी केली जाणारी वृक्षतोड त्यामुळे पर्यावरणावर होणारा परिणाम घातक असल्याचे देखील सांगण्यात आले.

# गोहत्याच्या निषेधाबाबत मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडचे तहसीलदार व माणगाव पोलीस यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यातील निजामपूर विभागात विळे भागाड चखऊउ हद्दीतील येलावडे गावच्या परिसरात ३० सप्टेंबर २०२१च्या रात्री अज्ञात इस्माकडून दोन गोमाता आणि एका गोवंशाची अमानुषपणे हत्या करण्यात आली.राज्यात गोहत्या बंदी असताना अश्या प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत. राज्यात सामाजिक सलोखा कायम रहावा यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून संबंधित गुन्हेगारावर योग्य ती कडक कारवाई करण्यात यावी याकरिता ४ ऑक्टोबर रोजी मराठा सेवा संघ – संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून माणगांव तहसीलदार व पोलीस ठाणे येथे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष शिवश्री वैभव हरिश्चंद्र सुर्वे यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की,महाराष्ट्र राज्यात गोहत्या प्रतिबंध कायदा लागू असताना देखील अशा प्रकारच्या घटना विविध ठिकाणी वारंवार घडताना दिसत आहेत. तरी दोन्ही समाजात तेढ निर्माण होऊ नये यासाठी अशा गुन्हेगारावर



योग्य कारवाई व्हावी. हे निवेदन देताना मराठा सेवा संघ – संभाजी ब्रिगेडचे उपाध्यक्ष शिवश्री निलेश महाडिक, शिवश्री राजू सुतार, शिवश्री अजित सुतार, शिवश्री संजोग गायकवाड, शिवश्री भरत सुतार, शिवश्री इकिंदर शेवाळे, शिवश्री निलेश महाडिक उपस्थित होते.

# नागोठणे पोलिस ठाण्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची ना. आदिती तटकरेंकडून पाहणी

## उर्वरित कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन

**दै.रायगड नगरी । वाकण**

रोहा तालुक्यातील मध्यवर्ती व महत्वाच्या अशा नागोठणे पोलिस ठाण्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उर्वरित काम निधीअभावी रखडले आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यमंत्री व रायगडच्या पालकमंत्री ना. आदितीताई तटकरे यांनी नागोठणे पोलिस ठाण्यास भेट देऊन पोलिस ठाण्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची सद्यस्थितीची पाहणी केली. या इमारतीच्या कामासाठी वाढीव अंदाजपत्रकानुसार निधी उपलब्ध देण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन यावेळी आदितीताई तटकरे यांनी जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक अशोक दुधे यांना दिले. याशिवाय या इमारतीसाठी परिसरातील कंपन्यांचा सी.एस.आर निधी मिळविण्यासाठीही प्रयत्न करणार असल्याचे यावेळी आदितीताई तटकरे यांनी स्पष्ट केले.

यावेळी रायगड जिल्हा पोलिस अधिक्षक अशोक दुधे, पोलिस उपाधिक्षक किरणकुमार सुर्यवंशी, रोहा तहसीलदार कविता जाधव, नागोठण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते भाई टके, शहराध्यक्ष बाळासाहेब टके, विभाग अध्यक्ष संतोषभाई कोळी, सचिन कळसकर, प्रकाश मोरे, विनायक गोळे, ध्रुव सोष्टे, चेतन टके, गुड्डू मोदी, जगदीश दिवेकर, मनोज ताडकर, पंकज टके, तात्या पोत्रिक आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते, पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यावेळी उपस्थित होते. नागोठणे पोलिस ठाण्याच्या प्रशासकीय इमारतीच्या उर्वरित बांधकामासाठी लवकरच निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने ही इमारत लवकरच तयार होऊन येथूनच पोलिस ठाण्याचा कारभार सुरू होईल अशी अपक्षा नागरिकांतून व्यक्त करण्यात येत आहे.

# सिडकोतर्फे ८ ऑक्टोबरला सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट (आभासी) चे आयोजन

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळातर्फे ०८ ऑक्टोबर २०२१ रोजी सिडको इन्व्हेस्टमेन्ट न्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट (आभासी–व्हर्च्युअल) चे आयोजन करण्यात आले असून नवी मुंबईमध्ये उपलब्ध असलेल्या गुंतवणुकीच्या विविध संधींविषयी या कार्यक्रमात चर्चा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात स्वतंत्र आणि समर्पित सत्रांमध्ये नवी मुंबईमध्ये यापूर्वीच ज्यांनी गुंतवणूक केली आहे असे गुंतवणूकदार नवी मुंबईत गुंतवणूक करण्याचे फायदे आणि नवी मुंबईमध्ये गुंतवणूक करण्याकरिता सर्वसाधारण माहिती याविषयी सर्वसाधारण जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमात नियोजित काळात विविध प्रकल्प पूर्ण करण्याच्या सिडकोच्या क्षमता आणि नवी मुंबईमध्ये सिडकोकडून करण्यात आलेली बांधकामे आणि विकास याबद्दलही माहिती देण्यात येणार आहे. तसेच नवी मुंबईतील आतिथ्य, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व इतर क्षेत्रांचा विकास सुकर व्हावा, याकरिता सिडकोने हाती घेतलेल्या विविध विकास प्रकल्पांबद्दलही या कार्यक्रमात माहिती सांगण्यात येणार आहे.

सिडकोने नेहमीच नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सिडकोने अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आणि नवी मुंबईतील जीवनमान उंचवाण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास केला. महागृहनिर्माण योजना, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई मेट्रो, कॉर्पोरेट पार्क इ. प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर असून या प्रकल्पांमुळे नवी मुंबईतील पायाभूत विकास क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून येणार आहेत. तसेच सिडकोने शहराला उत्तम संधानता (कनेक्टिव्हिटी) लाभण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे भावी गुंतवणूकदारांना गुंतवणुकीच्या उत्तम संधी उपलब्ध होणार आहेत.

सदर कार्यक्रम हा सिडको आणि भावी गुंतवणूकदार, विकासक, बांधकाम कंपन्या व संघटना यांदरम्यान संवाद प्रस्थापित करण्याकरिता उचललेले महत्तवाचे पाऊल आहे. यामुळे सिडकोला नवी मुंबईमध्ये गुंतवणुकीच्या व्यवहार्य आणि आकर्षक संधी निर्माण करण्याकरिता उपाययोजना आणि धोरण आखण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमास सिडकोतील अधिकाऱ्यांसह N-REDCO, CRED-I, MCHI सारख्या नामांकित संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून आपले विचार ते या कार्यक्रमाच्या माध्यमातून मांडणार आहेत. तसेच शिक्षण, आरोग्य, परिवहन आणि क्रीडा क्षेत्रांतील प्रतिनिधीही उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत.

सदर कार्यक्रम (समीट) हा सर्व गुंतवणूकदार आणि सर्वसामान्य नागरिकांकरिता खुला असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याकरिता https://avtaar.eletsonline.com/cidco/registration या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात यावी. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी http://cidco.eletsonline.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.